**ललिता गंडभीर**
Lalita Gandabhir
4200 N. OCEAN DRIVE,1501-2
RIVIERA BEACH,
FL 33404 USA.

# गोपाळ आणि सारा

दुपारी चार वाजता कामावरून परतलेली रंजना थोडा वेळ पडून विश्रांती घेण्याच्या विचारात होती. एवढ्यात दारावरची बेल वाजली. रंजनाच्या कपाळाला आठ्या पडल्या. कोण आलं होत ते तिला माहीतच होतं. शेजारची सारा. हल्ली ती न चुकता रोजच येत असे. रंजना कधी घरी येते याची वाटच बघत बसलेली असायची ती! साराला शाळेतून परत घरी आल्यावर वेळ घालवायला दुसरं काही साधनच नव्हतं.

तिच्या घरी रुक्ष मध्यमवयीन हाऊसकीपर होती.एखाद्या हाडामांसाच्या पुतळ्याप्रमाणे ती न बोलता काम करायची. साराला जेवायला वाढायची. साराचे वडील महिन्यातून पंधरा दिवस फिरतीवर असत. ते मोठ्या हुद्यावर नोकरीला होते. पंधरा दिवस घरी असले तरी खूपदा ते उशिरा येत. त्यांच्या आठ वर्षांच्या मुलीसाठी त्यांना फार वेळ नव्हता. मधून मधून शनिवारी किंवा रविवारी ते साराला बाहेर जेवायला किंवा झू मध्ये फिरायला घेऊन जात एवढंच.

सारा चार वर्षांची असताना तिची आई तिला सोडून दूर कुठल्यातरी बौद्ध धर्माच्या कॉम्युन मध्ये राहायला गेली होती. साराचे आजी-आजोबा एक कॅलिफोर्निया तर एक फ्लॉरिडाला असे राहत होते. कधी ख्रिसमस तर कधी समरमध्ये सारा त्यांच्याकडे थोड्या दिवसांसाठी जात असे. पण एरवी नेहमी येणंजाणं घडत नसे. कारण अंतर फार होतं.

तसं साराला काहीच कमी नव्हतं. तिच्या वडिलांचं ह्या महागड्या, भपकेदार सबर्बमध्ये प्रचंड घर होतं. ती मागेल त्या वस्तू तिचे वडील तिला आणून द्यायचे. तिच्या वाढदिवसाला मोठमोठी प्रेझेंट्स यायची. घराभोवती खूप मोठी बाग होती. त्यात पैसे देऊन कामाला माळी ठेवला होता. बागेत गालिच्यासारखी मऊ हिरवळ होती. पण त्यावर खेळायला साराशिवाय दुसरं मूलही नव्हतं. कारण त्या श्रीमंत, विरळ, विखुरलेल्या घरांत राहणाऱ्या बहुतेकांची मुलं वयाने मोठी होती. अशा

वस्तीत घर घेणं भरमसाट किंमतीमुळे मुलं मोठी झाल्याशिवाय कुणाला शक्यच होत नसे. शिवाय घरात अंतर फार असल्यानेही कारशिवाय  कुठे जाणंही शक्य नव्हतं.

रंजना व तिचा नवरा दिनेश वर्षांपूर्वी भारतातून अमेरिकेला आले होते. ते राहायला अपार्टमेंट शोधत होते. तेव्हा दिनेशच्या ऑफिसमधल्या ओळखीच्या माणसामार्फत त्यांना हे प्रचंड घर माफक भाड्यात मिळालं होतं. त्या घराचा मालक तीन वर्षं परदेशात गेला होता. त्याला घर कुलूप लावून ठेवायचं नव्हतं. म्हणून तो कुणीतरी जोडपं घरांत राहायला शोधत होता. त्याला रंजना व दिनेश भेटले. अनेक माणसांतून घरमालकाने त्यांची निवड केली.

रंजनाने अमेरिकेला आल्यावर डे केअर सेंटरमध्ये नोकरी धरली.तिथे ती नोकरीवर जाणाऱ्या आईवडिलांची मुलं सांभाळायची.तशी रंजनाला मुलांची आवड होती म्हणून तिला डे केअर ची नोकरी मनापासून आवडत असे.

अशीच एकदा रंजना फिरायला गेली असताना तिला सारा भेटली. निळे डोळे,सोनेरी केस,गोल चेहरा. सारा दिसायला फार गोड होती. ती रंजनाबरोबर फिरायला आली. मग हळूहळू फिरायला येतेस का म्हणून विचारायला येऊ लागली. साराच्या वडिलांनी चार पाच वेळा रंजनाला “हाऊसकीपरला रजेवर जायचयं, तुम्ही साराला सांभाळता का?” म्हणून विचारलं. तेव्हा रंजनाने आनंदाने साराचं बेबीसीटिंग केलं. अशा रीतीने साराशी रंजनाचा बराच सहवास घडला,बरोबर प्रेमही लागलं.

पण हल्ली सारा रोजच रंजना घरी आली की येऊ लागली होती. रंजनाला कामावरून आल्यावर थोडा वेळ विश्रांती घ्यावीशी वाटत असे. सारा आली की, साराच्या बडबडीमुळे ते शक्य नव्हतं. नंतर रंजनाचा तास, दीड तास स्वैपाक करण्यात, घर आवरण्यात जायचा. त्यामुळे तिला दमायला व्हायचं.

नाईलाजाने रंजनाने दर उघडलं.सारा एक पेन घेऊन दरवाज्यात उभी होती.तिला यावेळी येत जाऊ नकोस असं रंजनाने सांगितलं होतं. तरीही ती आली होती म्हणून तिच्या चेहऱ्यावर चोरट्यासारखे भाव होते.

“स्वतःला सांभाळायची नसली तर ही माणसं, मुलं होऊ तरी का देतात?”रंजना मनात चरफडली.

साराने पेन रंजनाला दाखवलं. ”हे पेन मी तुझ्यासाठी आणलंय!पाच रंगांचं आहे.” सारा म्हणाली. आणि पेन कसं काय वापरायचं ते दारातच उभी राहून रंजनाला दाखवू लागली.

"पेन नको मला." असं म्हणून साराला घरी पाठवावं असा विचार रंजनाच्या मनात येऊन गेला पण साराच्या चेहेऱ्यावरचे आर्जवी भाव बघून ती विरघळली. तिने साराला आत बोलावलं. पण आत येताच नेहमीसारखी साराची कळी खुलली नाही. ती रंजनाला पेन देऊन मलूलपणे बसून राहिली.

"का सारा? काय झालंय?" शेवटी रंजनाने विचारलं. साराने स्वतःच्या मनावर घातलेला बांध फुटला आणि ती हुंदके देऊन रडू लागली. "डॅडी, वर्षासाठी इंग्लंडला राहायला जाणार आहेत. मी कुठे राहायचं हा प्रश्न आहे. दोन्ही आजी-आजोबा नाही म्हणाले."

साराने रंजनाकडे आशेने पाहिलं. साराच्या मनातले विचार रंजनाला एखाद्या पुस्तकासारखे वाचता येत होते. साराला रंजनाकडे राहायला यायचं होत. रंजनाने मग विषय बदलला.

"सारा, तुला आईस्क्रीम हवंय का?"

"मॉनॉपली खेळू या का?"

"फिरायला ला जाऊ या का?"

"साराचं मन रिझवण्यासाठी रंजनाने एकामागून एक केलेले प्रयत्न व्यर्थच ठरले. साराची कळी खुललीच नाही. साराच्या वडिलांचा रंजनाला तिच्या अपेक्षेप्रमाणे फोन आला. "साराला, तुमच्याकडे राहायचं आहे. तिचा सर्व खर्च व वर सांभाळण्याचे पैसे द्यायला मी तयार आहे, ठेवून घेता का तिला एक वर्ष?"

रंजनाने दिनेशशी या विषयावर आधीच चर्चा केली होती. महिना-दीड महिना साराला सांभाळायला ती तयार होती. पण एक वर्ष! एवढी जबाबदारी घ्यायला रंजना तयार नव्हती. नुकतंच तिचं लग्न झालं होतं. तिला स्वतःला मूल होण्यापूर्वी थोडी मोकळीक हवी होती. तिच्या भावाचं मुंबईला लग्न होतं. तेव्हा सारा कुठे राहणार हा प्रश्न होताच. रंजनाला नाही म्हणताना वाईट वाटलं पण "साराला सांभाळण्याची जबाबदारी माझी नाही. तिच्या आई-वडिलांची, तिच्या नातेवाईकांची आहे. तिचे आजी-आजोबा नाही म्हणू शकतात तर मी का म्हणून नाही म्हटल्याचं वाईट वाटून घ्यावं?" असं काही स्वतःलाच समजावून रंजनाने तात्पुरतं तरी समाधान करून घेतलं. व साराच्या वडिलांना नाही म्हणून सांगितलं.

नंतर काही दिवस सारा आलीच नाही. एकदा आली पण रंजनाकडे रहाण्याविषयी काही बोलली नाही. ती आल्यावर रागावली आहे हे रंजनाला कळलं. रंजनाला तिची दया आली. आठ वर्षांच्या चिमुकल्या साराचे हे आई-वडिलांच्या छत्राखाली निर्धास्तपणे खेळायचे दिवस होते. पण तिच्या नशिबाने तिच्यावर "आपण कुठे राहणार?" ह्याची काळजी करायची पाळी आली होती. रंजनाला आपलं बालपण आठवलं.

‘आई-वडील जिवंत असताना मुलांनी कुठे रहावं हा प्रश्न उदभवू शकतो.’ हा विचार रंजनाच्या तेव्हा स्वप्नातसुद्धा आला नव्हता. आई-वडिलांचं मुलावर नैसर्गिक प्रेम असतं अशी तिची ठाम समजूत होती. आई किंवा वडील वारलेल्या मुली तिच्या ओळखीच्या होत्या. एक दोघींना सावत्र आया होत्या. पण त्यांचा राहण्याचा प्रश्नला कधीच उद्भवला नव्हता. दोन मुलींचे तर आईवडील दोघंही वारलेले होते. एक तिच्या मामाकडे तर एक काकाकडे राहत होती .म्हणून आईवडील दुर्दैवाने वारलेच तर नातेवाईक मुलांना सांभाळतात अशी रंजनाची समजूत होती.

इकडे साराचे आई-वडील, आजी-आजोबा सगळे जिवंत होते. रग्गड पैसाही होता, पण कुणाच्याही जीवनात तिला स्थान नव्हतं. कुणालाही तिच्यासाठी वेळ नव्हता.

शेवटी साराच्या मनावरचं ओझं उतरावं म्हणून रंजनानेच तो विषय काढला.

“सारा, तुझे डॅडी लंडनला गेल्यावर तू कुठे राहणार?”

“मला ठाऊक नाही.” साराला विषय निघाल्याने एकदम पुन्हा भरून आलं.

“मला जीनासारखं फॉस्टर होममध्ये राहायचं नाही. तिथली माणसं जीनाला वाईट वागवतात.”

‘आई-वडिलांना काही कारणाने मुलांना सांभाळता आलं नाही तर सरकार पैसे देऊन लोकांना मुलं सांभाळायला देतात. सरकार ह्या घराची सोशल वर्करमार्फत आधी तपासणी करून आई-वडील व इतर रहिवासी मानसिक व शारीरिक दृष्ट्या मुलांना सांभाळायला योग्य आहेत का, ह्याची खात्री करून घेत. तरीसुद्धा डे केअर सेंटरच्या अनुभवामुळे सर्वच मुलांना फॉस्टर होममध्ये चांगल्या रीतीने वागवलं जाईल, ह्याची खात्री देता येत नाही.’ ह्याचा रंजनाला डे केअर सेंटरच्या नोकरीमुळे अनुभव होताच. अगदी चांगल्या फॉस्टर होममध्ये सुद्धा ’प्रेम,जिव्हाळा,आपुलकी’ इत्यादी मुलाच्या योग्य मानसिक वाढीला लागणाऱ्या घटकांचा पुरवठा असेल, हे उत्तम सोशलवर्करलाही ठरवता येणं अशक्यच होतं. ही सर्व माहिती असल्यामुळे साराची फॉस्टर होमविषयीची भीती खोटी, असं म्हणणं रंजनाला शक्य नव्हतं.

“सारा,आई-वडिलांकडे पैसे नसले तरच मुलांना फॉस्टर होममध्ये ठेवतात. तुझ्या डॅडींकडे खूप पैसे आहेत.”

रंजनाने साराची तात्पुरती समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

“कुणीच मला ठेवून घ्यायला तयार नाही. पैशाचा उपयोग काय? दोन्ही आजी-आजोबांनी काय काय कारणं दिली. जागा लहान आहे, शाळा लांब आहे.आणि तू.....”

सारा एकदम थांबली.

“हे बघ सारा, तुझे डॅडी काही तरी मार्ग काढतील. तू काळजी करू नकोस.” रंजनाने तिला आश्वासन द्यायचा प्रयत्न केला.

त्या रात्री रंजनाने साराच्या डॅडींना फोन केला. ते “साराला बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवावं लागणार आहे.” असं म्हणाले.

आणखी पंधरा दिवसांनी रंजनाने साराचा भरल्या डोळ्यांनी निरोप घेतला. सारा बोर्डिंग स्कूलमध्ये निघून गेली. रंजना जड मानाने घरी परतली.

पंधरा दिवसांनी रंजना भारतात भावाच्या लग्नासाठी आली.

रंजना अमेरिकेत असताना तिचे आई-वडील त्यांचं गाव सोडून कायमचे मुंबईला राहायला आले होते.त्यांनी मुंबईला मोठा ब्लॉक घेतला होता. मुंबईची रंजनाला सवय नव्हती. जवळच असलेल्या झोपडपट्टीची तर मुळीच नव्हती.

पत्रे, गोणपाट, विटा, सिमेंट, माती इत्यादी मिळेल त्या साहित्याने बांधलेली ती झोपडपट्टी. प्रत्येक झोपडपट्टीसमोरच्या गटारातून वाहणारं सांडपाणी, त्यातून काही माणसांनी समोर लावलेली झाडं, त्या सर्व गर्दीतून खेळणारी मुलं, मधून मधून हिंडणाऱ्या कोंबड्या आणि बकऱ्या. अमेरिकेतून आल्यामुळे रंजनाच्या नजरेत सगळचं भरत होत. विशेषतः मुलं, त्यांनी न घातलेले किंवा अतिशय मळकट कपडे, त्यांचं त्या घाणीत खेळणं, सगळचं तिला बोचत होतं. तिच्या नकळत ती आपल्या डे केअरमधल्या मुलांच्या आणि ह्या मुलांच्या परिस्थितीची तुलना करत होती.तुलना करणं योग्य नाही, दोन्ही देशांच्या परिस्थितीमध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे हे तिला कळत होतं. तरी पण तुलना होतच होती.

जसजसे दिवस गेले तशी रंजनाला मुंबईची सवय झाली. झोपडपट्टी डोळ्यांसमोर असली तरी सारखे झोपडपट्टीचे विचार मनात येईनासे झाले. तेव्हाच तिला गोपाळ भेटला.

एकदा बिल्डिंगसमोरच्या बस स्टॉपवर रंजना उभी होती. जवळच फूटपाथवर झोपडपट्टीतल्या मुलांचा क्रिकेटचा खेळ चालला होता. तिथून कुणी तरी मारलेला बॉल तिच्या पायाशी येऊन पडला. तिने वळून पाहिलं तर बॉलच्या मागे एक सात-आठ वर्षांचा, मळकट हाफपॅंट घातलेला, उन्हाने रापलेला राकट चामडीचा अनवाणी मुलगा धावत येत होता. तो रंजनाजवळ येऊन थोड्या अंतरावर उभा राहिला. आपल्या जवळ यायचं धैर्य त्याला होत नाही हे रंजनाने ओळखलं. तिने त्याच्याकडे निरखून पाहिलं. त्याच्या केसांवर धुळीचा थर बसला होता. गुढघ्यावर दोन वाहणाऱ्या जखमा होत्या. त्याच्या हाडं आणि चामडीमध्ये मासं होतं की नाही याची शंका यावी इतका तो बारीक होता. त्याला त्याच्या शारीरिक परिस्थितीची जाणीव किंवा पर्वा होती असं मात्र रंजनाला दिसलं नाही. त्याचे काळेभोर डोळे मात्र बॉलवर खिळले होते.

नकळत रंजना त्याच्याकडे पाहून हसली आणि म्हणाली,

“कुठे राहतोस तू?”

त्या मुलाने झोपडपट्टीकडे बोट दाखवलं.

“नाव काय तुझं?” त्याला बोलायला लावायचं या हेतूने रंजनाने विचारलं.

“गोपाळ.” उत्तर आलं.

“गोपाळ, शाळेत जातोस का तू?”

गोपाळने पुन्हा ‘हो’ म्हणून मुंडी हलवली.

एव्हाना गोपाळच्या चेहेऱ्यावर कुतूहल उमटलं होतं. रंजनात आणि त्या मोठ्या बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या इतर माणसांत फरक आहे, हे त्याच्या बालमनाला समजलं होतं. तो आ वासून तिच्याकडे बघत होता.

“तू आज शाळेत का गेला नाहीस?”

रंजनाने संभाषण चालू ठेवण्याचा प्रयत्न केला.तिच्या डोळ्यांत गोपाळची कृश मूर्ती खुपत होती आणि पर्समध्ये एक चॉकलेटचं पाकिट ठसठसत होतं. ते गोपाळला काढून द्यावं असा तिला मोह होत होता. पण आईची सूचना कानात घुमून तो मोह ती टाळत होती. आई म्हणाली होती,

“झोपडपट्टीतल्या मुलांना काही देऊ नकोस. तू अमेरिकेहून आली आहेस. मोठा माणुसकीचा पुळका येतोय तुला! काही देत राहिलीस तर सारखे मागे लागतील तुझ्या! चोर मेले!!”

“गोपाळ,गोपाळ. …….. ”खेळ चालला होता त्या दिशेने आरोळ्या आल्या. गोपाळचे सौंगडी गोपाळच्या वेळ काढण्याने अस्वस्थ झाले होते. रंजनाने फळकुटाच्या स्टंपसकडे नजर टाकली. आणि बॉल गोपाळकडे ढकलला. गोपाळ बॉल उचलून खेळायला धावला. पण जाण्यापूर्वी रंजनाकडे बघून हसायला तो विसरला नाही.

नंतर रंजना बस स्टॉपवर उभी असली की,गोपाळ कुठून उगवायचा! गोपाळची रंजनाला बरीच माहिती झाली.

गोपाळचं कुटुंब काही वर्षांपूर्वी एका खेड्यातून मुंबईला आलं होत.गोपाळ कोपऱ्यावरच्या शाळेत आईने ढकललं तरच जात असे. पन्नास मुलांना एक शिक्षक असलेली ती शाळा रंजनाने पाहिली होती. एकूण शाळेत जाणं गोपाळला पसंत नव्हतं. घरी दोन वेळच्या जेवणाखाण्याची पंचाईत होती. बरेच बहीण-भाऊ होते. आई धुणीभांडी, घरकाम करायची. बाप काय करायचा हे गोपाळला नक्की ठाऊक नव्हतं. पण एक-दोनदा तुरुंगात जाऊन आला होता. गोपाळ अधून-मधून आईला व बापाला मदत करायला जायचा. कधीतरी शाळेत जायचा. काहीच उद्योग नसला तर टिवल्याबावल्या करत हिंडायचा.

एका रात्रीत झोपडपट्टीत पोलिस कार, ॲम्ब्युलन्स आली. नंतर खूप आरडा-ओरडा ऐकू आला. पोलिस काही माणसांना ट्रकमध्ये भरून घेऊन गेले.

रंजना अस्वस्थ झाली.

“नेहमीचंच आहे ते. तू लक्ष देऊ नकोस.” आई म्हणाली.

दुसरे दिवशी रंजना मुद्दाम बस स्टॉपवर उभी राहिली. अपेक्षेप्रमाणे गोपाळ उगवलाच.

“गोपाळ,रात्री काय झालं?” तिने विचारलं

“मारामारी झाली. पोलिस आले. त्यांनी माणसांना पकडून नेलं. माझ्या बापाला पण पकडून नेलं.”

गोपाळने अगदी सहज बातमी द्यावी तसे सांगितलं.

“तुझी आई कुठे होती?”

रंजनाने काळजी न दाखवता विचारलं.

“आई ना? दोन दिवसांपूर्वी कुणाच्या लग्नाच्या कामाला मोठ्या बहिणीला मदतीला ठेऊन गेली आहे.” गोपाळ

“तुझी आई नव्हती. बापही तुरुंगात गेला. मग तू कुठे राहतोस?” रंजना.

“काकाकडे. त्याची झोपडी जवळच आहे,तो नसला तर मावशीची पण झोपडी आहे त्या टोकाला.” गोपाळने बोट दाखवून मावशीची झोपडी कुठे आहे ते सांगितलं.

गोपाळ अगदी निर्धास्त होता. त्याचे वडील तुरुंगात होते,आई कुठे ते त्याला ठाऊक नव्हतं. पण आपलं काय होईल,ह्याची त्याला फिकीर नव्हती.

“अखेर मूल हे त्याच्या घराण्याचंच असतं. केवळ भौतिक श्रीमंतीनं मुलाला सुरक्षित वाटत नाही. सुरक्षितता व मानसिक शांतता आपल्या ओळखीच किंवा घरातलं कुणी. आपल्याला सांभाळेल ह्या ज्ञानानेच येते. सरकारने लाखांनी खर्च केलेल्या पैशाने येत नाही.”

रंजनाच्या डोक्यात विचारचक्र चालू होतं.

सारा व गोपाळ दोघंही तिच्या मनःचक्षूंपुढे उभे होते. साराकडे एक प्रकारची श्रीमंती होती तर गोपाळकडे दुसरी! निदान लहान मुलांच्या दृष्टीने तरी गोपाळच्या श्रीमंतीला आगळचं महत्व होतं.

“गोपाळ,तू खरा श्रीमंत आहेस. तुला मी काय म्हणते ते कळणार नाही कदाचित पण आहेस खरा श्रीमंत!”

“काय?म्हणजे काय?” गोपाळने आ वासून विचारलं. त्याला काहीच कळलं नव्हतं. एकदम रंजनाने पर्समधून चॉकलेट काढलं. आणि गोपाळला दिलं.

“हे,तुझ्यासाठी हं!” ती म्हणाली.

का कोण जाणे पण आईने दिलेली धोक्याची सूचना ती आज पूर्णपणे विसरली. चॉकलेट पाहून गोपाळच्या चेहऱ्यावर खजिना मिळाल्याचा आनंद उमटला. चॉकलेट घेऊन त्याने घाईघाईने वरचा कागद फाडला आणि खात खात उडया मारत हसत तो झोपडपट्टीत नाहीसा झाला.

(पूर्वप्रसिद्धी तारेवरची कसरत, श्रीविद्या प्रकाशन १९८७.)

(गोष्टीचा कालावधी १९८४ ते १९८७.)